**नि.फौ.ख.क्र. २८७/२०२२**

**सरकार–वि–तुळशीराम चौधरी**

**निशाणी क्र. ३०**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यशोदाबाई नामदेव चौधरी यांचा शपथेवर आरोपीचे वकील श्री. व्ही.एस. पाटील यांच्यामार्फत उलटतपास चालू.**

१. मला लिहिता वाचता येत नाही. पोलीसांनी माझा जबाब कोणत्या तारखेला व किती वाजता घेतला होतो ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की माझा जबाब पोलीसांनी तयार केला होता. आरोपी क्र. १ माझा दिर आहे. आरोपी क्र. २ माझा पुतण्या, आरोपी क्र. ३ हौशाबाई माझी जाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्यामध्ये व आरोपींमध्ये शेतीचे तोंडी वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की शेतीच्या वाटपावरुन तथाकथीत घटनेपूर्वीपासूनच आमचे व आरोपींचे संबंध ताणलेले आहे. माणिक चौधरी, निवृत्ती चौधरी हे माझे भाऊबंद आहेत. हे म्हणणे खरे आहे की माणिक चौधरी व निवृत्ती चौधरी यांचे आरोपींसोबत बोलणे नाही.

२. ज्या शेतामध्ये आमचा आरोपींसोबत वाद झाला होता त्याचा गट नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींसोबत सामाईक बांधावरुन आमच्यात पूर्वीपासून वाद आहे. आमच्या घराच्या बाजूला अशोक चौधरी राहतात. आज मी न्यायालयामध्ये माझ्या मुलासोबत आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयात काय साक्ष द्यायची ते मला माझ्या मुलाने सांगितले आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की फावडे प्रत्येक शेतकऱ्याकडे असते. पोलीसांनी माझा जबाब वडनेर भैरव पो.स्टेशनला नोंदवला. घटनेवेळी मला आरोपी हौशाबाई व दिनकरने शिवीगाळ केली होती. माझ्या मुलावर नाशिकला दवाखान्यात उपचार घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल बी व सी कडील फोटो पोलीसांना मी दिले होते. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल ए कडील फावडे पोलीसांना मी दिले होते. ते फावडे पोलीसांना कोणी दिले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे

खरे नाही की आर्टीकल ए कडील फावडे मी केवळ न्यायालयातच पाहिले. हे म्हणणे खरे नाही की तथाकथीत घटना माझ्या शेतामध्ये घडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी आरोपी क्र. १ ने मला व माझ्या सुनेला तसेच माझ्या मुलाला फावड्याने मारल्याचे मी खोटे सांगत आहे.

४. सरकारी दवाखान्यामध्ये उपचारासाठी पोलीसांनी मला पत्र दिले होते किंवा कसे हे मला माहित नाही. नाशिकला सरकारी दवाखान्यात मी व माझा मुलगा ॲडमीट होतो. मात्र मी किती दिवस ॲडमीट होते ते मला सांगता येणार नाही. माझा जबाब कोणत्या पोलीसांनी घेतला ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी घटनास्थळावर न येता आमचा जबाब पो.स्टेशनला नोंदवला. घटनास्थळावर किती पोलीस आले होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की माणिक चौधरी व निवृत्ती चौधरी यांना पो.स्टेशनला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की पो.स्टेशनला आम्ही सर्वजण सोबत गेलो होतो.

५. हे म्हणणे खरे आहे की माझ्या घरापासून गावाकडे जाणारा रस्ता कच्चा आहे. हे म्हणणे खरे आहे की गावाकडे यायचे झाल्यास मी, माझा मुलगा व सुन एकाच गाडीवर येते. हे म्हणणे खरे नाही की दुचाकीवरुन येतांना मी, माझा मुलगा व सुन कच्च्या रस्त्यावर पडल्यामुळे आम्हाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की आरोपींसोबत आमचा सामाईक बांधावरुन नेहमी वाद होत असल्यामुळे ही खोटी फिर्याद आम्ही आरोपींविरुद्ध दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की शेतीच्या जुन्या वादावरुन आरोपींविरुद्ध ही खोटी केस केलेली आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.08.06 15:10:47 +0530

**दि. ०५.०८.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**चांदवड**